सोमवार दि.१८ नोव्हेंबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ७२

दैनिक बीड लोकनेता

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# त्यांची राजकीय कारकीर्द विश्वास घाताची, गद्दारीची-धनंजय मुंडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अकोले (वृत्तसंस्था)**

मंत्री धनंजय मुंडे यांनी पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर टीका केली आहे. अहिल्यानगर येथील अकोले येथे आयोजित सभेत बोलताना मुंडे म्हणाले, त्यांची राजकीय कारकीर्द विश्वासघाताची आणि गद्दारीची राहिली आहे, असे नाव न घेत शरद पवारांवर टीका केली आहे.

धनंजय मुंडे म्हणाले, तुतारीच्या आदर्श नेतृत्वाने शाहू कोण आणि गद्दार कोण हे आम्हाला सांगावे? ७८ पासून त्यांची राजकीय कारकीर्द विश्वासघाताची आणि गद्दारीची राहिली आहे. पण त्यांनी केले तर गद्दारी नाही. त्यांच्याच सांगण्यावरून दादा आणि आम्ही केले तर आम्ही गद्दार. अशी टीका शरद पवारांवर नाव न घेत धनंजय मुंडे यांनी केली आहे.

पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले, अजितदादा आणि आम्ही कुणासोबत गद्दारी केली नाही. आमचे इमान मायबाप जनतेशी आहे. जनतेला विकासाचे जे स्वप्न दाखवले ते पूर्ण करण्यासाठी सत्तेत सहभागी झालो. २०१९ ला भाजप - शिवसेनेला पूर्ण बहुमत मिळाले होते. पण काय खेळ झाला बघा. भाजपपासून कुणाला फोडले? त्याला काय म्हणतात शाहू? त्याला गद्दारी म्हणत नाही ओ. गद्दार कोण? तर आमच्यासारखे छोटे कार्यकर्ते. ते मोठे, त्यांनी काहीही केले तर जमतं, असा खोचक टोला मुंडे यांनी लगावला आहे.धनंजय मुंडे म्हणाले, समोरा समोर बसायचे असेल तर धनंजय मुंडेंची तयारी आहे. २०१७ पासून दिल्लीत काय झाले ते दादांचा शपथविधी ते महाविकास आघाडीचे सरकार येण्यापर्यंत काय झाले हे पुराव्यानिशी सिद्ध करेल. आम्हाला गद्दार म्हणू नका. ७८ पासून महाराष्ट्राच्या जनतेसोबत गद्दारी कुणी केली? हे सर्वांना माहिती आहे. आम्ही पुरोगामी विचारांशी कुठलीही तडजोड न करता महायुती सहभागी झालो, ते फक्त विकासासाठी, असे धनंजय मुंडे म्हणाले.



# कौन बनेगा नांदेड का एम पी और एम एल ए स्पर्धेचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**



डॉ.हंबर्डे (भाजप महायुती) | प्रा.चव्हाण (काँग्रेस महाआघाडी) | भोसीकर (वंचीत बहुजन) | ॲड.अल्ताफ (इंडीयन नॅशनल लिग) | अलजाबरी (एमआयएम इंकीलाब) | ॲड.दिलीप ठाकूर (संयोजक)

नांदेड लोकसभेच्या पोटनिवडणुकीबद्दल प्रचंड उत्सुकता असून सट्टेबाजीला आळा बसावा आणि कल्पकतेला वाव मिळावा यासाठी नेहमीप्रमाणे कौन बनेगा नांदेड का एमपी और एमएलए या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून अचूक उत्तरे देणाऱ्या दहा विजेत्यांना आकर्षक पारितोषिके देण्यात येणार असल्याची माहिती संयोजक भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य धर्मभूषण ड.दिलीप ठाकूर यांनी दिली आहे.

भाजपा नांदेड महानगर, लायन्स क्लब नांदेड सेंट्रल व अमरनाथ यात्री संघाच्या वतीने या स्पर्धेचे मोफत आयोजन करण्यात आले आहे .यापूर्वी कौन बनेगा क्रिकेट विश्वविजेता, कौन बनेगा फुटबॉल विश्वविजेता,कौन बनेगा नांदेड का एमपी,कौन बनेगा नांदेड का एमएलए या यासारख्या २७ पेक्षा जास्त स्पर्धा वेळोवेळी आयोजित करण्यात आलेल्या आहेत.या स्पर्धांना नांदेडकरांनी प्रचंड प्रतिसाद दिलेला आहे.प्रत्येकाने आपल्या मनात कोण जिंकेल याची खूणगाठ बांधलेली असते. आपला अंदाज व्यक्त करण्यासाठी काहीजण आपसात पैज लावतात तर काहीजण सट्टेबाजीकडे वळतात. परंतु त्यामध्ये मोठे नुकसान झाल्यामुळे कित्येकांना आत्महत्या करावी लागली आहे. मनातील खुमखुमीला व्यक्त करण्यासाठी संधी मिळावी व कोणतेही नुकसान होऊ नये या उद्देशाने हा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी घेण्यात येणाऱ्या कौन बनेगा नांदेड का एमपी और एमएलए स्पर्धेसाठी पुढील प्रमाणे नियम ठेवण्यात आले आहे. इच्छुकांनी नांदेड लोकसभा निवडणुकीत कोण विजयी होईल व किती मताने विजयी होईल याचा अंदाज व्यक्त करायचा आहे. तसेच नांदेड जिल्ह्यातील नऊ विधानसभा मतदारसंघात कोण विजयी होणार हे ९४२१८ ३९३३३ या मोबाईल नंबर वर स्पर्धकांनी स्वतःचे नाव व गाव लिहून साध्या एसएमएस द्वारे पाठवायची आहे. अचूक उत्तराच्या जवळपास येणाऱ्या दहा विजेत्यांना एका समारंभात मान्यवरांच्या हस्ते आकर्षक पारितोषिके देण्यात येणार आहेत. दहापेक्षा जास्त स्पर्धकांनी अचूक उत्तर दिल्यास जाहीर सोडतीद्वारे दहा स्पर्धकांची निवड करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. एका मोबाईल वरून फक्त एकदाच भाग घेता येईल. मोबाईल शिवाय भाऊ ट्रॅव्हल्स, कलामंदिर समोर, नांदेड या पत्त्यावर पोस्टाद्वारे देखील अंदाज सादर करता येईल. २२ नोव्हेंबर पूर्वी स्पर्धकांनी आपला अंदाज व्यक्त करणे आवश्यक आहे. तरी आपल्या मनातील उत्सुकतेला दिशा देण्यासाठी नागरिकांनी या स्पर्धेची माहिती सर्व मतदारांना देऊन मोठ्या संख्येने या स्पर्धेमध्ये सहभाग घ्यावा असे आवाहन संयोजक ड.दिलीप ठाकूर यांनी केले आहे.

# भोसे गावातून भुमी पुत्र राम शिंदे साहेबांना मिळणार मोठे मताधिक्य



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

राम शिंदे साहेबांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे भोसे गावातील भाजप कार्यकर्ते आणि समर्थक प्रत्येक मतदारांच्या गाठीभेटी घेऊन महायुती सरकारने केलेली विकासकामे लोकांपर्यंत पोहचवत आहेत. याचाच एक टप्पा म्हणून काटे वस्ती आणि ढोले वस्तीवर सर्व मतदारांच्या भेटी घेऊन राम शिंदे साहेबांना मोठे मताधिक्य देण्याची विनंती शिंदे समर्थकांकडून करण्यात आली. यावेळी बोलताना तालुका दुध संघाचे संचालक दादासाहेब खराडे आणि राजेंद्र ढोले यांनी मार्गदर्शन करत राम शिंदे साहेबांनी सरकारच्या माध्यमातून केलेल्या विकासकामांची मोठी यादी मतदारांसमोर ठेवली. महायुती सरकारने महिलांना एसटी प्रवासामध्ये ५०% सवलत,जलयुक्त शिवार ओढा खोलीकरण सौर उर्जा प्रकल्प विवीध रस्त्याची कामे मुलींना उच्च शिक्षणासाठी शिक्षण मूल्य माफ केंद्र आणि राज्य सरकारचे प्रत्येकी सहा हजार लाडकी बहिण योजनेचे पंधरा हजार सरकार देत आहे.महायुती सरकारने विज बिल माफी केली तर याउलट महविकास आघाडीच्या काळात तीन महिन्याला वीज बील वसुली केली जात होती.

यावेळी उपस्थीत सर्व मतदारांनी भूमिपुत्राला मोठ्या उमेदीने मतदान करणार असल्याचे सांगितले.

यावेळी तालुका दुध संघाचे संचालक दादासाहेब खराडे माजी सरपंच राजेन्द्र ढोले रमेश राउत बाळासाहेब ढोले जालिंदर खराडे मोहन ढोले बंडू ढोले सुनील ढोले भाऊसाहेब राउत रामा ढोले ईश्वर राउत ज्ञानदेव ढोले आकाश राऊत अविनाश क्षीरसागर विक्रम खराडे भीमा ढोले भुजंग क्षीरसागर दिपक खराडे विकास राऊत प्रदिप खराडे लक्ष्मण काटे अनिल खराडे मयुर खराडे दिगंबर ढोले आणि ईतर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोपरगाव विधानसभा निवडणूक प्रचारानिमित्त ‘महाराष्ट्रवादी प्रचार सभा’

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कोपरगाव । प्रतिनिधी**


महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत व माजी आमदार अशोक काळे यांच्या अध्यक्षतेखाली कोपरगाव येथे प्रचारसभा पार पडली. कोपरगाव मतदारसंघातील प्रश्न सोडवण्यासाठी आवश्यक ती मदत करू, अशी ग्वाही अजित पवार यांनी यावेळी दिली. तसेच, पुढील काळात सर्व प्रलंबित प्रश्न मार्गी लावू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या सभेला महानंदाचे माजी चेअरमन राजेश परजणे, अशोक रोहमारे, राजेंद्र जाधव.

# इंदापूर येथे शरद पवार यांची हर्षवर्धन पाटील यांचेसाठी आज प्रचाराची सांगता सभा

## वाघ पॅलेस मैदानावरती होणार जंगी सभा;खा.सुप्रिया सुळे,शरद पवार कोणावर तोफ डागणार ?

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, संघर्ष योद्धा खा. शरद पवार यांची पक्षाचे उमेदवार हर्षवर्धन पाटील यांच्या प्रचाराची सांगता सभा इंदापूर येथे वाघ पॅलेस शेजारील भव्य मैदानावरती सोमवारी (दि.१८) दुपारी १२.३० वा. आयोजित करण्यात आली आहे. या सभेला खा.सुप्रिया सुळे उपस्थित राहणार आहेत. ज्येष्ठ नेते खा.शरद पवार यांचे इंदापूर तालुक्यावर विशेष लक्ष असल्याने ते या सभेत विरोधकांवर कोणती तोफ डागणार ? याकडे जनतेचे लक्ष लागून राहिले आहे.सध्या खा.शरद पवार यांची इंदापूर तालुक्यामध्ये लाट निर्माण झालेली आहे. तसेच दुसऱ्या बाजूला हर्षवर्धन भाऊ पाटील यांचेबद्दलही मतदारांमध्ये सहानुभूती दिसून येत आहे. राज्यामध्ये महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर येणार असल्याचे स्पष्ट अंदाज सर्व्हेतून व्यक्त केले जात आहे. खा.शरद पवार यांनी केलेल्या राज्यव्यापी निवडणुक प्रचार दौऱ्यास जनतेकडून प्रचंड मोठा प्रतिसाद मिळाला आहे. महाराष्ट्रात सत्ता बदल करायचाच व तो होणारच! अशी ग्वाही शरद पवार आता भाषणातून देत आहे.

गद्दारांना सुट्टी नाही असे ब्रीदवाक्य घेऊन महाराष्ट्रभर सभा गाजवलेले खा.शरद पवार इंदापूरच्या प्रचाराच्या या सांगता सभेत काय बोलतात? याकडे इंदापूर तालुक्याचे लक्ष लागून राहीले आहे. खा.शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष व महायुतीचे उमेदवार हर्षवर्धन पाटील यांच्या प्रचारासाठी होणाऱ्या ऐतिहासिक सभेस इंदापूर तालुक्यातील नागरिकांनी प्रचंड संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

### हर्षवर्धन पाटील यांचेबद्दल जनतेत मोठी सहानुभूती!

**हर्षवर्धन भाऊ पाटील यांचेबद्दल गेल्या काही दिवसांपासून जनतेमध्ये मोठी सहानभूती दिसून येत आहे. या सहानुभूतीमध्ये दिवसेंदिवस वाढ होत चालली असून, हर्षवर्धन पाटील यांचेसाठी जनतेने व युवकांनी निवडणूक हाती घेतल्याचे चित्र दिसत आहे. तसेच दुसऱ्या बाजूला खा. शरद पवार व खा.सुप्रियाताई सुळे यांनी इंदापूरच्या या निवडणुकीत विशेष लक्ष घातले आहे, त्यामुळे इंदापूर तालुक्यातील वातावरण तुतारीमय झाले आहे. खा.शरद पवार यांच्या होणाऱ्या प्रचाराच्या या सांगता सभेने गावा-गावातील कार्यकर्त्यांना आणखी ऊर्जा प्राप्त होणार आहे.**

## दरबार ए शायरी

जनहित आणि राष्ट्रहिताचा
विचार असू दे मनामधे !
लोकशाहीचा घटक तू, तरी
विवेक वसू दे मनामधे !!
नितीमत्ता कर्तव्य दक्षता
सदा ठसू दे मनामधे !
कांगावा आंधळेपण तृष्णा
कधी नसू दे मनामधे !!

डॉ.विजयकुमार कस्तुरे, ॲडव्होकेट, चिखली.

## चारोळी

एक आपले मत सुद्धा
खूप अमूल्य असते
लोकशाहीची ताकद
खरं तर त्यातूनच दिसते.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# आष्टी तहसील कार्यालय समोर उत्कृष्ट नियोजन अंतर्गत रांगोळी काढून त्यावर घोषवाक्य लिहून नवनिर्वाचित मतदारांना संदेश दिला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी,पाटोदा,शिरूर विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत मतदार जनजागृती अभियान चालू असून आष्टी मध्ये विधानसभा निवडणूक अधिकारी श्रीमती वशिमा शेख,तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील,नायब तहसीलदार बळवंत मोरे,गटशिक्षणाधिकारी श्री सुधाकर यादव,गटशिक्षणाधिकारी श्री बोंदर्डे साहेब,श्री.गालफाडे साहेब यांच्या उत्कृष्ट नियोजन अंतर्गत रांगोळी काढून त्यावर घोषवाक्य लिहिण्यात आले,यासाठी रांगोळी कलाकार अनिल बेदरे यांनी श्रम घेतले अक्षर रांगोळीतून मतदार जनजागृतीसाठी वेगवेगळे घोषवाक्य लिहून नवनिर्वाचित मतदारांना कलाकार अनुष्का बेंद्रे,आरोही बेद्रे यांनी आकर्षक रांगोळीद्वारे संदेश दिला यावेळी आदी पदाधिकारी,कर्मचारी उपस्थित होते.





## संपादकीय..

# महाराष्ट्रातील निवडणुका आणि लोकशाहीचे महत्त्व



सध्या महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुकीचे वारे जोरात वाहत आहेत. तीन दिवसांत निवडणुकांचे निकाल जाहीर होईल आणि एक नवा सरकार सत्तेवर येईल. परंतु, याच निवडणुकीच्या काळात एक गोष्ट स्पष्ट आहे – कोणतेही सरकार येवो, ते फार मोठे बदल घडवणार नाही. लोकशाहीमध्ये, दर पाच वर्षांनी आपल्याला सरकार बदलावे लागते किंवा त्याला पुन्हा निवडून द्यावे लागते.

आम्हाला अनुभव आहे की देशाचा एक नैसर्गिक विकासदर असतो. राजकारणी लोक अनेक वेळा काही कामे भ्रष्टाचारासाठी करतात. त्या कामातून प्रत्यक्ष विकास होत नसला तरी, तो थोडक्यात चांगला असतो. रस्ते, वीज, पाणी, वाहतूक व्यवस्था अशा गोष्टींचा काही प्रमाणात विकास होतो. तरीही हे सर्व सुधारणा या भ्रष्टाचाराच्या चुकांमुळे होतात, आणि हे आपल्याला दिसत असले तरी त्यातून काहीतरी चांगले घडते.

परंतु, विकास याचा खरा अर्थ केवळ रस्ते आणि इन्फ्रास्ट्रक्चर न होता, समाजाच्या सर्वांगिण प्रगतीत असावा लागतो. समाज जितका शिक्षित आणि समजदार होईल, तितका देशाचा विकास दर वाढेल. पण आजकाल अनावश्यक खर्च फारच वाढला आहे. बडेजाव, फुशारकी आणि ऐषोआराम वाढत चालला आहे, ज्यामुळे सरकारवर असलेला खर्चही वाढत आहे. हा खर्च जराही विकासात न घेता केवळ सार्वजनिक खर्च म्हणून मानला जातो. यातून काही रोजगार निर्माण होतो, पण खरा विकास मात्र होत नाही.

हे खरे असले तरी, हा खर्च काही लोकांना रोजगार देतो आणि म्हणून तो देखील फायदेशीर ठरतो. गोरगरीब लोकांना चांगले रोजगार मिळत असले तरी, त्यांचे जीवनमान सुधारत नाही. निवडणुकीत होणाऱ्या आश्वासनांचा निराशाजनक इतिहास आहे. सरकार बदलते, पण तेच जुने वचन पुन्हा दिले जाते. तसेच, लोकांनी खोट्या आश्वासनांवर विश्वास ठेवून मतदान केल्यानंतर त्यांची निराशा होत असते. म्हणजेच, आमच्या राज्यात काय होईल, हे आपल्याला ठरवायचं आहे. आपल्या हक्कासाठीच मतदान करणं महत्वाचं आहे. पण सर्वांचा विकास होईल असे सरकार निवडून आणण्याची जास्त गरज आहे. आज आपण ज्या राजकारण्यांना निवडून पाठवतो, ते आपल्याला सत्तेत येऊन काय करतात, हे आपल्याला पाहायला मिळते. कोणत्याही कारणामुळे त्यांना निवडून आणणं जर आपण आवश्यक समजत असू, तर त्याचं परिणाम काय होईल हे देखील आपल्याला समजतं.लोकशाहीचा खरा उपयोग म्हणजे, आपल्याला हक्क असलेल्या प्रतिनिधींना निवडून आणून, त्यांना आपल्या दृष्टीने योग्य निर्णय घेण्याची संधी देणे. त्यामुळे, प्रत्येकाने विचारपूर्वक मतदान केले पाहिजे. कदाचित परिस्थिती कितीही कठीण असली तरी, आपल्याला मतदानाची जबाबदारी पार पडली पाहिजे.तर, चला, तदान करा आणि ते सरकार निवडा, जे आपल्यासाठी एक चांगला आणि समृद्ध भविष्य निर्माण करू शकेल. आपल्या देशाला एक नवा दिशा देईल.

**अतिथी संपादक:**
**प्राचार्य डॉ.भारत कऱ्हाड**

---

बाजारातून विकत घेतलेला
भाजीपाला एक दोन दिवसात सडून
जातो खराब होतो नंतर त्याची
किंमतही राहत नाही....
पण शेतात मातीत आपली मुळ
जमिनीत खोलवर रुतून आपल्या
मातीशी एकनिष्ठ असलेलं पीक
भाजीपाला कधी सुकत नाही
,सडत नाही आणि त्याची
किंमतही कमी होत नाही...
म्हणून विकले जाऊ नका, जर
विकले गेलात तर सडले
जाल,आणि जर एकदा सडले
गेलात तर समाजातून नाकरले
जाल....
आपली किंमत जर कोणी
कवडीमोल करत असेल तर त्याला
त्याची किंमत दाखऊन द्या,
कारण मतदार राजा आहे ,आणि
हे लोकप्रतिनिधी आपले सेवक
आहेत...
आजही स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर
ही प्रत्येक मतदार संघात छोट्या
छोट्या मूलभूत सुविधांचा अभाव
पाहायला मिळतो ..
हे अपयश फक्त त्या एका
लोकप्रतिनिधीच नाही तर आपली
निवड चुकली याचं आहे ..
म्हणून आपण ही आपल्या
मागासलेल्या पणाला तितकेच
जबाबदार आहोत.
लोकप्रिनिधी निवडून येतात त्यांचा
आणि त्यांच्या कुटुंबाचा सर्वांगीण
विकास होतो ,त्यात मात्र ते कुठं
ही तिळमात्र कमी पडत नाहीत.
पुढील पाच पिढ्या बसून खातील
एवढं कमवून ठेवून जातात ,पण
त्यांनी केलेलं एक साधं काम ही
पुढील पाच वर्ष टिकत नाही..
हे असं का याचा जाब तुम्ही
आम्ही मतदारांनी विचारायला
हवा,
एक वेळेस तरी यांचा एक मोठा
संभ्रम तोडा की पैश्याचा जीवावर
आपण निवडणूक जिंकून येऊ...
हे काय करणार गाव ची गाव
विकत घेऊ आणि आपल्या पुढील
पिढ्यांना समृद्ध करण्यास मोकळे
होऊ....
पण विचार करा आज ही मतदार
संघातील छोट्या मोठ्या
वाड्या,वस्त्या, तांड्या पर्यंत
जाण्यासाठी रस्ता नाही ,त्यांना
लाईट नाही,पाणी नाही ही किती
मोठी शोकांतिका आहे ,,
या गोष्टीचा कुठतरी विचार
व्हायला पाहिजे..
कोरड्या विहिरीत कितीही मोटरी
टाकून पाणी काढान्याचा प्रयत्न
केला तरी पाणी बाहेर येऊ शकतं
नाही, तस कोरडी आश्वासने
देणाऱ्याला किती ही मतदान देऊन
निवडून आणलं तरी त्यातून
विकासच पाणी बाहेर येऊ शकतं
नाही ...
काळ्या पाषाणागत कठोर
झालेल्या या नेत्यांना त्यांची
किंमत नक्कीच दाखऊन द्या ..
त्यामुळं मतदान करताना विचार
करून मतदान करा कारण आता
एकदा चुकलात तर केलेल्या
चुकिवर पुढील पाच वर्ष पश्चाताप
करण्याखेरीज आपल्यापाशी काही
एक उरणार नाही आणि त्याचा
काही उपयोग ही होणार नाही
...
त्यामुळं तुम्ही ठरवा विकून सडलं
जायचं की
बिना विकता भिडून त्यांना नडलं
जायचं
कारण आज नडलोत तर उद्या
घडलोत समजा,
आणि आज झुकलोत तर उद्या
संपलोत समजा.
एक मतदार...

**–आकाश नागरे**

---

# लॉन्ड्री सेवा आणि ग्राहक

ड्राय क्लीनिंगचे कपडे जेव्हा ग्राहकाला परत दिले जातात तेव्हा ते बंद पॅकेजमध्ये असतात. आपणही सर्वांनी हे अनुभवले असेलच. परत घेतलेले कपडे हे जाड तपकिरी कागद, प्लास्टिक किंवा वर्तमानपत्रात गुंडाळून दोऱ्याने बांधून दिले जातात. मात्र लाँड्रीतून आणलेले हे कपडे आपण त्याचवेळी पाहात नाही. दोन दिवसांनी हे पॅकिंग उघडतो तेव्हा त्यात बरेच कपडे हे फाटलेले, डाग लागलेले आणि गहाळ झालेल असतील तर? काय कराल तर निडरपणे ग्राहक न्यायालयात आपली तक्रार मांडा आणि न्याय मिळवा. कसा तो या लेखातून वाचा



नवरात्र, दिवाळी असे सणांचे दिवस संपले. सण म्हटले की, छान छान रेशमी महागातले कपडे घालून मिरवणे आलेच. एका ट्रेनच्या प्रवासात या छान छान कपड्यांविषयी बोलणे चालू होते. बापरे! आता घरी जाऊन धोबीघाट काढावा लागणार. बॅगेतले कपडे लाँड्रीला द्यावे लागणार. तो खर्चही किती वाढलाय वगैरे. यांची कटकट असते. घरी धुता येत नाहीत. मग ड्राय क्लीनिंग, वॉशिंग, इस्त्री यासाठी लॉन्ड्रीवर अवलंबून राहावे लागते. तसेच सुट्ट्यांमधील ट्रीपवरून आल्यावर सुद्धा जाकीट, सूट, स्वेटशर्ट हे देखील ड्राय क्लीनिंगला द्यावे लागतात. अशाच एका ट्रीपवरून येताना आमचे आपापसात बोलणे चालू होते. ही सर्व चर्चा समोर बसलेले एक गृहस्थ ऐकत होते. ते म्हणाले तुम्ही लाँड्रीबद्दल बोलत आहात तर तुम्हाला एक खरी घडलेली गोष्ट सांगू का? गोष्ट म्हटल्यावर आम्हीही सरसावून बसलो. ही गोष्ट घडली गोव्यात. श्री गुरुदास यांनी गोम्स लाँड्रीत २० एप्रिल रोजी कपड्यांच्या ३ जोड्या ड्राय क्लीनिंगसाठी दिल्या. कपडे त्यांनी एका लग्नासाठी मुंबईतून खरेदी केले होते. ते रेशमी आणि महागातले होते. त्यांना लाँड्रीतून बिल दिले गेले आणि कपडे २५ तारखेला मिळतील असे सांगितले. गुरुदास २५ तारखेला कपडे आणण्यासाठी लाँड्रीत गेले तेव्हा कपडे तयार नव्हते. ते २८ तारखेला मिळतील असे सांगितले. त्यानुसार गुरुदास २८ तारखेला जाऊन कपडे घेऊन घरी आले. घरी येऊन सर्व आटोपल्यावर कपडे कपाटात ठेवताना उघडले तर कपड्यांची एक जोडी गायब झालेली, तर दुसरे कपडे फाटलेले आणि जळालेले दिसले.आता एवढ्या रात्री लाँड्री तर बंद झालेली. म्हणून दुसऱ्या दिवशी सकाळी बिलावरील नंबर पाहून त्यांनी लाँड्रीत फोन केला. लाँड्री मालकाने जरा उडवाउडवीच केली. म्हणून गुरुदास दुसऱ्या दिवशी लाँड्रीत गेले. सर्व कपडे दाखवून जाब विचारला. त्यावर मालकाने जळलेल्या, फाटलेल्या कुर्ता, पायजाम्याच्या बाबतीत झालेला निष्काळजीपणा मान्य केला. तेवढ्याची भरपाई देण्याची तयारीही दाखवली. पण गहाळ झालेल्या कपड्याची जबाबदारी घेण्याचे टाळले. त्याने गुरुदास यांचे बिल काढले आणि त्यावर बारीक अक्षरात लिहिलेली अट दाखवली. ती होती 'कपडा खराब अथवा गहाळ झाल्यास आमची जबाबदारी रु. १००/-पर्यंत मर्यादित असेल.' त्यामुळे तो फक्त तेवढेच पैसे देऊ शकेल असेही सांगितले.गुरुदास यांनी परत परत समजावूनही लाँड्री मालक काही ऐकण्यास तयार नव्हता. शेवटी नाईलाजाने गुरुदास यांनी गोवा राज्य ग्राहक आयोगात तक्रार दाखल केली. तक्रारीत त्यांनी कपड्यांची किंमत अकरा हजार तीनशे पंच्याहत्तर रुपये लिहिली होती. सोबत खरेदीचे बिलही जोडलेले. कपड्यांचे नुकसान झाल्याबद्दल रु. १५०००/- आणि जो मानसिक त्रास झाला त्याबद्दल रु. ५००००/- नुकसानभरपाई मिळावी अशीही मागणी केलेली. या फिर्यादींविरुद्धच्या बचावात लाँड्रीच्या वकिलांनी असा दावा केला की, त्यांच्या आशिलाकडून कोणताही निष्काळजीपणा झालेला नाही. उलट गुरुदास यांनी २५ तारखेलाच कपडे परत नेले. तसेच गुरुदास यांनी ड्राय क्लीनिंगला घेतलेल्या कपड्यांसाठी लाँड्रीकडे विमा संरक्षण आहे का अशीही चौकशी केली होती. याचाच अर्थ ते विमा कंपनीविरुद्ध दावा दाखल करून रक्कम वसूल करू इच्छित होते. गुरुदास यांना दिलेल्या पावतीवरची अट मान्य करूनच कपडे ड्राय क्लीनिंगला दिले होते. याअर्थी लाँड्रीच्या सेवेत कोणतीही कमतरता नव्हती. कपड्यांची डिलिव्हरी घेण्याआधी गुरुदास यांनी कपडे तपासूनही पहिले होते. त्यांचा पुढचा युक्तिवाद असा होता की एकदा ग्राहकाने कपड्यांची डिलिव्हरी घेऊन कपडे नेले की लाँड्रीला त्यापुढे जबाबदार ठरवू शकत नाही. राज्य आयोगाने दोन्ही पक्षांची सर्व लेखी निवेदने, प्रतिज्ञापत्रे आणि युक्तिवाद तपासले. इथे महत्त्वाची गोष्ट म्हणजे ग्राहक आयोगासमोर प्रत्येक गोष्ट/ घटना संपूर्ण संशयातीत असल्याचे सिद्ध करणे आवश्यक नसते. खून किंवा मोठ्या गुन्ह्यामध्ये असा अविवादीत पुरावा आवश्यक असतो. कारण अशा प्रकरणांमध्ये आरोपीच्या स्वातंत्र्याचा किंवा आयुष्याचा प्रश्न असतो. त्यामुळे ग्राहक न्यायालयातील निर्णय हे नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांवर, परिस्थितीनुसार काढलेल्या निष्कर्षांवर आणि व्यावहारिक दृष्टिकोन समोर ठेवून घेतले जातात.

ड्राय क्लीनिंगचे कपडे जेव्हा ग्राहकाला परत दिले जातात तेव्हा ते बंद पॅकेजमध्ये असतात असे खुद्द लाँड्रीनेच कबूल केले होते. आपणही सर्वांनी हे अनुभवले असेलच. परत घेतलेले कपडे हे जाड तपकिरी कागद, प्लास्टिक किंवा वर्तमानपत्रात गुंडाळून दोऱ्याने बांधून दिले जातात. साधारणतः हे पॅकिंग आपण उघडून बटन तुटलेले, फाटलेले जळलेले आहेत का हे लाँड्रीत तपासत नाही. असे केले तर इस्त्री केल्याचा काय उपयोग? फार तर एका कोपऱ्यातून कपडे आपलेच आहेत ना हे तपासून बघतो. बाकी गोष्टी घरी आल्यावरच कळतात. त्यामुळे गुरुदास यांनी डिलिव्हरी घेताना कपडे तपासून घेतले हा लाँड्रीच्या वकिलांचा दावा फोल ठरला. दुसरे म्हणजे पावतीवर बारीक अक्षरात छापलेली एकतर्फी अट ग्राहक कायद्यास मान्यच नाही. या सर्व बाबींचा विचार करता ग्राहक आयोगाने गुरुदास यांची तक्रार ग्राह्य ठरवून लाँड्रीच्या सेवेत खरोखरच कमतरता होती असा निर्णय दिला. लाँड्री मालकांनी गुरुदास यांना गहाळ आणि खराब झालेल्या कपड्याची किंमत अकरा हजार तीनशे पंच्याहत्तर रुपये देण्याचे निर्देश दिले. तसेच रु. १५०००/- नुकसान भरपाई देण्याचेही आदेश दिले. ही सगळी रक्कम ३० दिवसांच्या आत नाही दिली तर त्यापुढील कालावधीसाठी दंडात्मक व्याज आकारण्यात येईल अशी ताकीद देण्यात आली. ही गोष्ट ऐकल्यावर मी त्या गृहस्थांना विचारले की, तुम्हाला एवढे सविस्तरपणे कसे काय माहीत? तर त्यांनी सांगितले की, ते स्वतःच गोवा राज्य आयोगाचे निवृत्त अध्यक्ष होते. थोडक्यात काय? जिथे ग्राहक न्यायालयाच्या अध्यक्षांनाही न्यायालयाची पायरी चढावी लागते तिथे सामान्य ग्राहकाची काय कथा? त्यामुळे न घाबरता, निडरपणे ग्राहक न्यायालयात आपली तक्रार मांडा आणि न्याय मिळवा.

---

# 'बालपण' एक आठवणीतली सहल

आयुष्यात अनुभवलेली सहल प्रत्येकासाठी एक सुंदर अनुभव असतो. कोण्याएका संध्याकाळी त्या एका शांतसमयी या आठवणी ताज्या होतात आणि हळूच अंग मोहरून जातं. तसंच बालपणाचं आहे. 'बालपण' ही एक आठवणीतली सहल. ही सहल आणि त्या सहलीतला प्रत्येक टप्पा आपल्यासाठी आठवणींची ओंजळ असते. ती जपत ही सहल आयुष्यभर आपण एन्जॉय करतो. खूप सखाचे क्षण असतात या सहलीत. आज बालदीनानिमित्त या सहलीतल्या सुखद आठवणी जगताना

बाल युवा दोस्तांनो आज तुमचाच खास दिन, म्हणजेच 'बालदिन' अर्थात 'चिल्ड्रन्स डे'. या बालदिनाच्या तुम्हा सर्वांना खूप-खूप शुभेच्छा! या दिवसाचा इतिहास डोकावून पाहिला तर भारताचे माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे बालकांविषयी असणारे प्रेम प्रत्येक पिढीपर्यंत पोहोचावे म्हणून १४ नोव्हेंबर हा त्यांचा जन्मदिवस बालदिनाच्या रूपात साजरा केला जातो, हे आपल्या सर्वांनाच ठाऊक आहे. लहान मुले ही पंडितजींच्या हृदयातला एक अमूल्य ठेवा होता. चळवळी आणि राजकारणाच्या धबडग्यात ते केवळ बच्चेकंपनीमध्ये रमायचे आणि मुलांनाही 'चाचा नेहरू' अगदीच जवळचे वाटायचे. दरवर्षी विशेषत: बालदिनानिमित्त शाळांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या दिवशी मुले त्यांच्या कलागुणांचे प्रदर्शन करतात. त्यांच्यासाठी वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन केले जाते. मुलांना नृत्य, गाण्याची आणि भाषणे देण्याची संधी मिळते. तसेच लहान मुले ही कायमच त्यांच्या आगळ्यावेगळ्या कलागुणांनी सर्वांनाच आकर्षित करतात. जशी नेहरूजींना मुले आवडायची तशी आपल्या प्रत्येकालाच आवडतात. म्हणतात ना लहान मुलं ही देवाघरची फुलं असतात हे अगदी खरं आहे, त्यात काडीमात्र शंका नाही. एखादे मूल आपल्यासमोर हसत जरी असेल तर त्याला पाहून आपल्यालाही हसू येते आणि सहजच आपल्या लहानपणीच्या आठवणी जाग्या होतात.

लहानपण ही एक वारंवार हवीशी वाटणारी सहल असते. जसं आपण एखाद्या सहलीला मनमुरादपणे मज्जा, धमाल करतो असेच आपले बालपण; परंतु या सहलीचा कितीही 'वन्स मोअर' हवासा वाटत असला तरी पुन्हा जसाच्या तसा अनुभवणे शक्य होत नाही. बालपण हा आयुष्यातला सर्वात सुंदर टप्पा असतो, याबद्दल तर काहीच किंतु नाही. वयाचा कोणत्याही आकडा पार केला तरी लहानपणीच्या आठवणी काही पाठ सोडत नाहीत. लहानपणी केलेल्या चुका, आईचा मार, बाबांचा ओरडा, मित्र-मैत्रिणींसोबतची कट्टी-बट्टी, भूत-भूत, भांडीकुंडी, लपाछुपी, शाळेत न जाण्यासाठी केलेली कारणं, आई आज पोट दुखतंय गं असं म्हणत शाळेला मारलेली बुट्टी, कमी मार्क आल्यावर थोडसं बोललेलं खोटं आणि इतकंच नव्हे तर खेळता-खेळता आपण कुठे पडलो त्याच्या खुणा, मोठं होऊन डॉक्टर, पोलीस, टीचर बनायची स्वप्न शेवटच्या क्षणापर्यंत काही साथ सोडत नाहीत. या गोष्टी ही सारी स्वप्नं कायम आठवणींचे घर करून आपल्यासोबत राहतात.

एका विशिष्ट वयानंतर आपण मोठे होतो. जबाबदारी वाढते आणि नकळत खांद्यावर त्याचे दप्तर घेऊन एका वेगळ्याच प्रवासाला सुरुवात होते. मग तो अल्लडपणा, निरागसपणा, मज्जा-मस्ती या गोष्टी करणारे ते लहान मूल हळूहळू नाहीसं होऊ लागतं आणि एका नवीन गोष्टीशी आपली मैत्री होते. ती नवीन मैत्री म्हणजेच परिपक्वता किंवा समंजसपणा आणि सर्वांना सोयीस्कर असं म्हणायला गेलं तर मॅच्युरिटी. ही मैत्री गरजेची असते; परंतु या मैत्रीमुळे खूप गोष्टी सहज आपल्याकडून सुटत जातात आणि एक वेगळीच रेस सुरू होते. या स्पर्धेत सगळ्यांनाच पहिल्या क्रमांकावर यायचे असते. यासाठी रक्ताचे पाणी करून मेहनत करायची तयारी, जिद्द, चिकाटी आपोआप प्रत्येकामध्ये येते. हीच गोष्ट पिढ्यान-पिढ्या सुरू आहे, पण या सर्व गोष्टींमध्ये आपल्यातलं ते लहान मूल केव्हाच हरवून गेलेलं असतं.

मान्य आहे परिवर्तन गरजेचं असतं, मोठं होऊन समोर येणारी जबाबदारी पूर्ण करणे हे कर्तव्य असतं पण आपल्यातलं लहान मूल कायम जपणं देखील तितकंच गरजेचं आहे. या धकाधकीच्या जीवनामध्ये एक ब्रेक अत्यावश्यक आहे. कधी तरी आपल्यातलं ते लहान मूल पुन्हा हसताना, खेळताना, धडपडताना, चिडवताना दिसलं पाहिजे. रोज तर शक्य नाही प्रत्येकाने पण एक दिवस बालपणीच्या आठवणींमध्ये नाही तर प्रत्यक्षात बालपण जगले पाहिजे. हे सगळ्यांनाच करता आलं पाहिजे. आपल्या मुलांना तर मनमुरादपणे त्यांच्या या गोड क्षणांचा आस्वाद घेऊ द्या, पण कधी तरी तुम्ही लहान होऊन आपल्या बालपणीची ती हवीहवीशी वाटणारी सहल नक्कीच एकदा तरी करू या.

---

# नैसर्गिक क्लोनिंगची कमाल !

पांडो अस्पेन वृक्ष हे जगातील सर्वांत प्राचीन वृक्ष म्हणून ओळखले जातात. पांडो या लॅटिन शब्दाचा अर्थ 'मी पसरतो आहे' असा होतो. या झाडांनी जमिनीखाली क्लोनिंग करून ५० हजार वृक्ष विकसित केले आहेत. ही झाडे एकाच मुळामधून तयार झालेली आहेत. हा विशाल अस्पेन क्लोन अमेरिकेतील मध्य उटाहमध्ये आहे. मागील ८० हजार वर्षांपासून तो स्वतःचे काही भाग सतत वाढवत आहे. १०६ एकरावर पसरलेले हे झाड अंदाजे ६५०० टन वजनाचे आहे. हे झाड कॅलिफोर्नियाचे जनरल शेर्मन जायंट सेक्कॉइएन्ड या जगातील सर्वांत मोठ्या एकच खोड असलेल्या झाडाच्या तिप्पट वजनाचे आहे. संशोधकांनी १९७०च्या दशकात हा महाकाय क्लोन आहे, हे शोधले होते. पांडो १६ हजार ते ८० हजार वर्षे जुना असल्याचे शेकडो झाडांच्या अलीकडच्या डीएनए विश्लेषणाने समजले.



या क्लोनमधील काही झाडांचे खोड १३० वर्षांपेक्षा अधिक जुने आहे. हे झाड सतत स्वतःचे भाग पुन्हा निर्माण करते, जे कोमेजतात आणि मरतात. उत्क्रांतीविषयक बहुतेक अभ्यासांमध्ये द्विगुणितांचा, म्हणजे गुणसूत्रांचे दोन संच असलेल्या प्राण्यांचा समावेश असतो. असे प्राणी सामान्यतः लैंगिक पुनरुत्पादन करतात. पांडो अस्पेन झाड स्वतःचे क्लोन तयार करते. इतर झाडांच्या डीएनएची मदत न घेता या पांडोचे पुनरुत्पादन होते. यासाठी पराग आणि बीजांड यांची आवश्यकता नसते. मूळ प्रणाली आनुवंशिकदृष्ट्या एकसारखे अंकुर तयार करते, ते वरच्या दिशेने वाढतात, खोडामध्ये भर टाकतात आणि हजारो वर्षे वनस्पती जिवंत ठेवतात. मात्र सध्या असे होत नाही.ताज्या संशोधनात, पांडोच्या विकासामधील उत्परिवर्तनांची भूमिका जाणून घेण्यासाठी झाडांच्या वेगवेगळ्या भागांमधील आनुवंशिक अनुक्रम जाणून घेण्यात आला. त्यावेळी मुख्य झाडाच्या दीर्घायुष्यात निर्माण झालेल्या अनेक इतर नमुन्यांमध्ये चार हजार वेगवेगळे प्रकार सापडले. याचा अर्थ, या झाडाच्या डीएनएमध्ये उत्परिवर्तन होत आहे. पांडोच्या ७२ वर्षांच्या हवाई प्रतिमांमध्ये क्लोनिंगमध्ये घट झाल्याची चिन्हे २०१८च्या अभ्यासानुसार दिसून आली. सध्या हे महाकाय क्लोन धोक्यात आले आहे.

# बीड लोकसभेची पुनरावृत्ती परळी विधानसभेत होणार ;दलित ;मुस्लिम ;मराठा फॅक्टर चालणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

परळी विधानसभेत लोकसभेची पुनरावृत्ती होणार असल्याचे चित्र दिसत आहे . परळी मतदारसंघातील दलित; मुस्लिम; मराठा समाज महायुतीच्या उमेदवाराच्या विरोधात गेला असल्याचे चित्र दिसत असून मराठा समाज ही एक गठठा मतदार बाजूला पडला आहे. तर दलित समाजाची अस्मिता असलेल्या बौद्ध धम्म केंद्राची गेल्या पाच वर्षांपूर्वी मोठी घोषणा करूनही व मोठमोठे बॅनर तयार करूनही एक रुपयाचे सुद्धा काम करण्यात आले नसल्याने सध्या तरी दलित समाजात ही मोठ्या प्रमाणात रोष असल्याचे दिसत आहे. जातीयवादी भाजपच्या मित्रपक्षांना साथ न देण्याचा निर्णय दलित; मुस्लिम मराठा समाजाने घेतला आहे. विधानसभा निवडणुकीची प्रचार यंत्रणा जोरात आहे .येत्या आठ दिवसात यासाठी मतदान होणार असून आता प्रचार शिगेला पोहोचला आहे. प्रत्येक जण प्रचारात आघाडी घेताना दिसत आहे. परंतु दलित; मुस्लिम समाज, मराठा समाज या सगळ्याकडे बारकाईने बघत आहे मुळात दोन्ही समाज हे चांगल्या प्रकारे हुशार झाला आहे. याचे ताजे उदाहरण द्यायचे झाले तर गेल्या लोकसभेला परळी शहरातील भीमनगर या भागात महायुतीकडून जवळपास ४० ते ४५ लाख रुपयांची उधळपट्टी करण्यात आली असतानाही मताची टक्केवारी पाहता महायुतीच्या उमेदवाराने एवढे खर्च करूनही त्यांना फक्त ८९९ मते मिळाली तर वंचित बहुजन आघाडीला एक रुपया खर्च न करता ही ६०९ मतदान मिळाले तर या वार्डातील बुथवर एकही कार्यकर्ता राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचा नसताना देखील ही ४०६ मतदान पडले. यावरून लक्षात येते की (सारा गाव मामाचा एक नाही कामाचा) अशा प्रकारे आपल्या विचारांचा आणि कोणता पक्ष आपल्यासाठी धोक्याचा आहे याचा विचार समाज करताना दिसत आहे. याची परिचीती तर परळी विधानसभेत अधिकच जाणऊ लागली आहे .परळी विधानसभेची जागा महायुती मधून अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीला सुटली असून धनंजय मुंडे हे त्याचे उमेदवार असून धनंजय मुंडे यांनी आपल्या पूर्वीच्या कार्यातून चांगल्यापैकी कार्यकर्त्यांची जमवाजमव केली आहे, परंतु ते जातीयवादी पक्षासोबत असल्याने मुस्लिम आणि दलित समाज त्यांच्या पासून दुरावला असल्याचे चित्र आहे. शिवाय भाजपमधील काही वाचाळ नेत्यांनी तर हिंदुत्ववाचा पुरस्कार करताना दलित आणि मुस्लिम समाजाला टार्गेट केल्याचे यापूर्वीही दिसून आले आहे .भाजपच्या विचारसरणीला विरोध करण्यासाठी मुस्लिम आणि दलित समाजातील शिक्षित वर्गाने पुढाकार घेतला असून त्यांनी आपापल्या समाजाला महायुतीपासून दूर राहण्यासाठी प्रयत्न करताना दिसत आहेत .नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकी मध्येही असाच पॅटर्न राबवण्यात आला होता. व तो यशस्वी सुद्धा झाला आहे .त्यामुळे आता ही दलित मुस्लिम महायुतीच्या उमेदवाराला विरोध करताना दिसत आहे.यामुळे परळी विधानसभेचे उमेदवार यांच्यासाठी धोक्याची घंटा वाजत असल्याचे दिसत आहे.स्थानिक उमेदवाराला बघून मतदान देण्याचे दिवस आता संपले आहेत. ( मराठा कार्यकर्ते फक्त तोंड दाखवण्यापुरते सोबत असल्याचे दिसत आहे. ) मराठा आरक्षणाच्या आंदोलनानंतर समाजामध्ये प्रामुख्याने मराठा आणि ओबीसी असे दोन गट पडले आहेत हे दोन्ही समाज मोठ्या संख्येने असल्याने त्यांचा निवडणुकिवर परिणाम होताना दिसून आला आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत याची प्रचिती अवघ्या महाराष्ट्राला आली आहे. मराठा समाजासाठी जरांगे पाटील यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पाटील म्हणतील तोच उमेदवार असे एक मुखाने मराठा समाज बोलताना दिसतो .पाटलांची भूमिका सर्वश्रुत आहे. त्यामुळे महायुतीच्या उमेदवारांना अडचण निर्माण झाली आहे .तर दुसरीकडे उमेदवारा सोबत जे मराठा समाजाचे कार्यकर्ते आहेत ते फक्त चेहरा दाखवण्यापुरतेच आहेत. लोकसभेप्रमाणे समाज त्यांचे कांहीही ऐकणार नाही. तसेच दलित व मुस्लिम समाजाची परिस्थिती आहे.



सारा गाव मामाचा एक नाही कामाचा उपयोग काय ? महायुतीच्या उमेदवाराकडून दलित मागासवर्गीय समाजातील कांही नेते व कार्यकर्ते यांना पुढे करण्याचा प्रयत्न केला गेला आहे .त्यांच्यामार्फत पाठिंबा मिळवून घेत संपूर्ण दलित समाज आमच्या सोबत असल्याचे चित्र तयार करण्याचा प्रयत्न होतो आहे . ते जर जातीवादी पक्षाला आणि त्यांच्या मित्र पक्षाला मतदान करा असे आवाहन करीत असतील तर लोक त्याला जुमानणार नाहीत. आणि मुळात अशा लोकांच्या मागे मतदार किंवा जनाधार ही नाही. उलट त्यांचा दुष्परिणाम आणखी वाढू शकतो ) ( सोबत असलेल्या दलित कार्यकर्त्यांचे समाज ऐकेना ! ) दुसरीकडे दलित समाजाचे कार्यकर्ते सोबत घेऊन फिरणे म्हणजे मतदान मिळाले असे होत नाही. परिस्थिती अशी आहे की दलित समाजाच्या या कार्यकर्त्यांचे कसलेच म्हणणे समाज ऐकायला तयार नाही समाजाच्या मुळावर उठलेल्या आणि जातीयवादी असलेल्या भाजपच्या मित्र पक्षांना आम्ही मतदान करणार नाही अशी स्पष्ट भूमिका समाजाची आहे. समाजापुढे कार्यकर्त्यांनाही जाता येत नाही असाच प्रकार लोकसभेत ही घडला होता अनेक कार्यकर्त्यांनी समाजाला महायुतीच्या उमेदवाराला मतदान करण्याबाबत सांगण्याचा प्रयत्न केला होता मात्र त्यांना समाजाच्या तोंडावर पढावे लागले होते. यामुळे कितीही फुशारकीने दलित कार्यकर्ते फिरत असले तरी समाज त्याचे ऐकणार नाही .

# रमेश थोरात यांची उमेदवार म्हणून केलेली निवड योग्य-शरदचंद्र पवार

## वरवंडच्या सांगता सभेला लोटला जनसागर !

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

दौंड विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार रमेश थोरात यांची सांगता सभा पार पडली.या सभेला दौंड तालुक्यातील जनतेने प्रचंड प्रतिसाद दिला.आणि मोठ्या संख्येने तालुक्यातील नागरिक उपस्थित होते. भविष्यात रमेश थोरात महाराष्ट्राला योग्य मार्गदर्शन करतील.रमेश थोरात उमेदवार म्हणून मी केलेली निवड ही योग्य आहे. हे आजच्या सभेवरून सिद्ध झाले. ही प्रचाराची सभा नसून विजयाची सभा आहे.असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार म्हणाले.महाविकास आघाडीचे सरकार महाराष्टात आल्यानंतर दौंड मध्ये ज्या सोयी सुविधा झाल्या नाहीत,त्या सर्व रमेश थोरात यांच्या माध्यमातून पुर्ण केल्या जातील असेही यावेळी शरद पवार म्हणले.

त्यामुळे महायुतीच्या उमेदवाराचा पराभव नक्कीच होईल असे चित्र निर्माण झाले आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर महायुती बद्दल नाराजी असून महाविकास आघाडीचे सरकार महाराष्ट्रात नक्की येणार आहे. तुमचा उत्साह पाहुन असे दिसते की रमेश थोरात हे १००% निवडून येणार यात काहीच शंका नाही.असे शरद पवार म्हणाले. रमेश थोरात म्हणाले की मी गेली ४० वर्षापासून पवार साहेबांबरोबर राजकारणात सहभागी आहे, राजकारणा बरोबरच समाजकारण देखील केले,दौंड तालुक्याच्या विकासाला हातभार लावला. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर काम करत असताना राज्यस्तरावरच नाही तर आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील बँकेचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न केला.मला कोणत्याही प्रकारचं धन संपत्ती कमवायची नाही मला फक्त जनतेची सेवा करायची आहे.पवार साहेबांना साथ देण्यासाठी मला एकदा निवडून द्या.असे अवाहन माजी आमदार रमेश थोरात यांनी केले.यावेळी आप्पासाहेब पवार,भगवानराव वैराट,सोहेलभाई खान,माऊली शिंदे,नामदेव ताकवणे,पाराजी हंडाळ,आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन उत्तमराव आटोळे यांनी केले. दिग्विजय जेधे यांनी आभार मानले. यावेळी प्रचंड मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.



**दौंड तालुक्यामध्ये गेली पाच वर्षापासून दहशत,गुंडगिरी आणि झुंडशाहीचे राजकारण सुरू आहे ते थांबवायचं असेल तर रमेश थोरात यांनाच आमदार म्हणून निवडून द्यावे लागेल. मला विश्वास आहे यावेळी रमेश थोरात यांना दौंडची जनता आमदार करेल.**


**–भूषणराजे होळकर..**
**(वंशज अहिल्यादेवी होळकर.इंदोर)**

# उस्माननगर परिसरातील मतदार यादीत घोळ प्रभाग एकीकडे तर नाव दुसरीकडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर । गणेश लोखंडे**

उस्माननगर परिसरातील निवडणूक आयोगाने तयार केलेल्या मतदार यादीतील नावे हे प्रभाग एकीकडे तर नाव दुसरीकडे आल्याने घोळ झाल्याने मतदार हैराण झाले आहेत.उस्माननगर परिसरात १८ वर्ष पूर्ण झालेल्या नवीन मतदार नागरिकांनी ऑनलाईन अर्ज दाखल करून मतदान यादीत नावे समाविष्ट करण्यासाठी संबंधितांकडे नावे दिली. विधानसभा निवडणुक होत असल्याने नविन यादी प्रमाणे गावात शासकीय व पक्षाच्या पोलचिट्या वाटप करण्यात येत आहेत. बिएलओ. यांना पोलचिटच्या देताना कसोटीवर राहून वाटप करताना कसरत करावी लागत आहे. नविन मतदार यांची नावे आई वडील किवा परिवारासोबत न येता दुसऱ्या वार्डातील यादीत नावे आल्याने पंचायत झाली आहे. बिएल ओ यांना मतदार शोधताना पायाची चप्पल झिजून त्या मतदारांपर्यंत जावून पोलचिटी देऊन त्याची स्वाक्षरी घेताना दिसतात. प्रमुख पक्षांच्या पोलचिट्या वाटप करताना मोठी कसरत करावी लागत आहे.






# बारामती ला हेवा वाटेल असा माझा सिंदखेड राजा मतदार संघ घडवणार




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा । प्रतिनिधी**

सिंदखेड राजा तालुक्याचा विकास गेल्या २५ वर्षापासून भकास झाला असून विकास करण्याकरता सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघांमध्ये मी अपक्ष म्हणून उभी आहे. प्रत्येक गावात प्रत्येक खेड्यात शहरात नागरिकांचे प्रेम आशीर्वाद मिळत आहे त्यामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकू लागल्याचे टीकास्त्र सिंदखेड राजा मतदार संघाच्या अपक्ष उमेदवार गायत्री गणेश शिंगणे यांनी देऊळगाव राजा येथे दिनांक १६ नोव्हेंबर रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये केले आहे , पुढे त्या म्हणाल्या कि

सिंदखेड राजा मतदार संघामध्ये विद्यमान आमदार यांनी नागरिकांना कोणते विकास काम केले हे सांगावे परंतु त्यांच्याकडे कुठल्याही प्रकारचे काम केले नसल्यामुळे सांगण्यासारखे नाही 'तसेच पक्षाचे चिन्ह व नावाचे बॅनर ' जाणीवपूर्वक विरोधकांनी फाडले असून माझे बॅनर फाडले परंतु त्या बॅनरवर माझ्या आजोबाचा सुद्धा फोटो होता त्यामुळे माझ्या आजोबाचे बॅनर सुद्धा फाडले ,गेल्या एका वर्षापासून उपाशी तापाशी शेतकरी असेल मजूर वर्ग असेल यांच्यासाठी सिंदखेड राजा मतदारसंघांमध्ये फिरत आहे , शेंदुर्जन माझे मुळगाव त्याचबरोबर आमचे आजोबा असेल आजी असेल या सर्वांनी शेंदुर्जन गावातून सिंदखेड राजा मतदार संघातूनच आपल्या कामाची कार्याची ओळख निर्माण केली आहे त्यामुळे मी सिंदखेड राजा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची तयारी केली ' निवडणूक लढवण्याकरता व विजयी होण्याकरता मला माझ्या आजीचा सुद्धा पाठिंबा असल्याचे यावेळी गायत्रीताई शिंगणे यांनी सांगितले ,विरोधक केवळ अफवा पसरत असून मी पेटी बंद करत आहे त्याचबरोबर अर्ज मागे घेण्याच्या दिवशी सुद्धा मी अर्ज मागे घेणार असल्याच्या अफवा विरोधक पसरवत आहेत पेटी बंद करण्याचा प्रश्न उद्भवत नसून विरोधकाची पेटी हे मतदार बंद करणार असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले ' मला अनेक कामे करायची असून यामध्ये शेतकऱ्यांसाठी सिंचन व्यवस्था ' शेतीमालाला भाव ,आयटी कॉलेज ' आय आय टी आय कॉलेज ' त्याचबरोबर सिंदखेड राजा येथे राष्ट्रमाता माँ जिजाऊ साहेब यांच्या नावाने मेडिकल कॉलेज सुरू करण्याचे माझे स्वप्न असून हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जनता मला आशीर्वाद देत असल्याचेही यावेळी गायत्री शिंगणे यांनी सांगितले .

# हर्षवर्धन पाटील यांच्यासह जिल्ह्यातील महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांचा विजय निश्चित-खा.सुळे

## भाऊंबद्दल जनतेमध्ये सहानुभूतीची लाट;बावडा येथील सभेस विक्रमी गर्दी









■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

हर्षवर्धन भाऊ सांगत होते मी एकटा पडलोय,पण नाही भाऊ तुमची ही बहीण आहे ना ? तुम्ही माझ्याबरोबर थोरले भाऊ म्हणून उभे राहीलात,तुमची लहान बहिणी तुमच्या पाठीशी आहे. तसेच पवार साहेबांचे आशीर्वाद आपले पाठीशी आहेत.त्यामुळे हर्षवर्धनभाऊसह पुणे जिल्ह्यातील महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांचा विजय निश्चित आहे, असे प्रतिपादन खा.सुप्रिया सुळे यांनी केले.

बावडा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे इंदापूर विधानसभा मतदारसंघातील उमेदवार हर्षवर्धन पाटील यांच्या प्रचारार्थ शनिवारी (दि.१६) रात्री आयोजित सभेत खा.सुप्रियाताई सुळे बोलत होत्या.बावडा येथील सभेला विक्रमी गर्दी झाली होती.

सुप्रिया सुळे पुढे म्हणाल्या,बाजार तळावर लावलेला विरोधी पक्षाचा बॅनर मी आता पाहिला आहे.आयुष्यातली पहिली लढाई या बॅनर वरील पक्षाचे नाव व चिन्हा संदर्भात आहे.आयुष्यात मी कोर्टाची पायरी चढली नव्हती,पण यांच्यामुळे मी कोर्टाची पायरी चढले.पण मला आनंद आहे की त्याच्यामुळे मी भांडायला शिकले.या बॅनरवर चिन्हाच्या खाली लिहिलेलं पाहिजे की हे चिन्ह न्यायप्रविष्ठ आहे,पण या बॅनरवर मला ते कुठेही लिहिलेलं दिसलं नाही.म्हणून हा कोर्टाचा अपमान आहे.या बॅनरचा फोटो काढून मी उद्या कोर्टात दाखवणार आहे संविधानाने हा देश चालतो कोणाच्या बापाने नाही.चोरी आज तो पकडी गयी आता कोर्टातच गाठ आहे.तालुक्यात जिथे जिथे असे प्रचाराचे त्यांचे बॅनर आहेत त्यांना मी नोटीसच पाठवणार आहे.

विकसित-महाराष्ट्र-विकसित-इंदापूर, माझा पांडुरंग सांगतोय की,हर्षवर्धन भाऊंच्या नावासमोरील ४ नंबरच बटन दाबा.निवडणुकीमध्ये जे मला सोडून गेले त्यामुळे माझी मतं वाढली.त्यामुळे हर्षवर्धनभाऊसाठी हा शुभ संकेत आहे, असे प्रतिपादनही खा.सुप्रिया सुळे यांनी केले.

हर्षवर्धन पाटील भाषणात म्हणाले, जशी ताई तुमच्यावर वेळ आली शरद पवार आणि तुम्हाला सोडून सगळे गेले तशी आज माझ्याकडे वेळ आली आहे. काही लोक आम्ही मोठी केली त्यांना समाजात ओळख दिली त्यांना पद दिली गाड्या बंगले झाले कोणाच्या जीवावर झाले. आज समाजात मला एकटं पाडण्याचा प्रयत्न होत आहेत. ते पुढे म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे स्वयंघोषित अध्यक्ष अजित पवार यांनी निमगाव केतकीतील कार्यक्रमात माझ्यावरती टीका केली. ते म्हणाले आता हर्षवर्धन पाटलांकडे आता फक्त चारच माणसं राहिलेत. एक हर्षवर्धन पाटील, त्यांची पत्नी,मुलगी,मुलगा.तसेच वरुन ते खोचक असेही बोलले माझी विनंती आहे की त्यांच्यापैकी कोणाला फोडू नकाएवढं वाईट आहे आम्ही ? म्हणालाय लागले की यांचं सगळं संपलयं. पुढारी जरी सोडून गेले तरी सर्व जनता माझे बरोबर आहे. २० तारखेच्या मतदानातून आणि २३ तारखेच्या निकालातून राज्याला दाखवून द्या की इंदापूर तालुका हा हर्षवर्धन पाटील यांचे कुटुंब आहे,असे हर्षवर्धन पाटील यांनी सांगताच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.पवार साहेबांशी ज्यांनी गद्दारी केली अशा इंदापूरच्या गद्दारांना धडा शिकवायचं काम २० तारखेला करा,असे आवाहनही हर्षवर्धन पाटील यांनी केले. इंदापूर तालुक्यात १० वर्षात कसलाही विकास झाला नाही. एकालाही नोकरी मिळाली नाही,पाण्याचा प्रश्न आहे.मी तुमचा मोठा भाऊ म्हणून कायम तुमच्या पाठीशी उभा आहे.पुन्हा एकदा पवार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली जनतेचं सरकार महाराष्ट्रात येणार आहे,असा विश्वासही हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केला. खा.धैर्यशील मोहिते पाटील भाषणात म्हणाले,महिलांसाठी राज्यभर एस टी चा प्रवास मोफत, ३ लाखांपर्यंत कर्ज माफ, नियमित फेड करणा-यांना वर्षाला ५० हजार अनुदान देणार अशा घोषणा महाविकास आघाडीने केली आहे. सन १९८० साली महाराष्ट्राचं दरडोई उत्पन्न १४ टक्के होतं, २०२४ ला ते १३ टक्के आहे. इतर राज्यांचं उत्पन्न वाढले आहे. फाक्सकॉन,टाटा एअर बस असे उद्योग बाहेर राज्यात गेले.ग्रीन इंडियाचा प्रकल्प बाहेर गेला, ५ लाख रोजगार बाहेर गेले. विजयसिंह मोहिते पाटील,हर्षवर्धन पाटील मंत्री होते तेव्हा शासकीय नोकर भरती निघायची,एक आठवड्याच्या आत नियुक्तीपत्र हातात मिळायचे गेल्या दहा वर्षात किती शासकीय नोकर भरती निघाली ? आज खाजगी कंपनी परीक्षा घेतात तो पेपर फुटतो.राज्य सरकारने जाहीर केले की जिथे जिथे शिक्षक कमी पडत आहे तिथे रिटायर शिक्षक घ्यायचा मग आमच्या तरुण पिढीने काय करायचं ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. हर्षवर्धन पाटलांनी इंदापूर तालुक्यातील एमआयडीसी आणली १००००, लोकांना प्रत्यक्षात प्रत्यक्ष रोजगार मिळाला शरद पवारांनी सिनारमास आणली तिथेही कामगार काम करतात.इंदापूर तालुक्यात सर्व प्रकारचे शिक्षण उपलब्ध झाले आहे. शिक्षण संस्था उभा राहिल्या.ज्यांनी गेली दहा वर्ष इंदापूर तालुक्याचे नेतृत्व केलं किती लोकांना रोजगार दिला किती संस्था आणल्या सर्वसामान्याची मुल किती कामाला लावली. कोणती एखादी शिक्षण संस्था काढली ? माळशिरस तालुक्यातील बरेच कॉन्ट्रॅक्टर इंदापूर तालुक्यात काम करतात,असे खा.धैर्यशील मोहिते पाटील यांनी सांगितले. यावेळी पक्षाचे तालुकाध्यक्ष अँड. तेजसिंह पाटील,अशोकराव घोगरे, अंकिता पाटील-ठाकरे,उदयसिंह पाटील, सागरबाबा मिसाळ,मनोज पाटील, अमरसिंह पाटील,प्रफुल्ल चव्हाण,अमीर सय्यद,प्रभाकर खाडे,नाना गवळी आदींची भाषणे झाले.यावेळी राजवर्धन पाटील व मान्यवरांनी आलेल्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले.सभेस पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या सभेनंतर वकीलवस्तीसह अनेक गावातील युवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षामध्ये प्रवेश केला, या शेकडो युवकांचा हर्षवर्धन पाटील यांनी सत्कार केला. रामोशी समाज संघटनेसह अनेक संघटनांनी हर्षवर्धन पाटील यांच्याकडे पाठिंब्याचे पत्र दिले.

### युवकांमध्ये हर्षवर्धन पाटील यांची क्रेझ!

**युवकांनी सभास्थळी हर्षवर्धन पाटील यांना सुमारे २०० फूट अंतरावरून खांद्यावर घेऊन आणले. यावेळी सर्व मतदार व स्टेजही उभे राहून हर्षवर्धन पाटील यांचे स्वागत करीत होते, यावेळी युवकांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण झाला. त्यामुळे युवक हे हर्षवर्धन पाटील यांना चक्क स्टेजच्या पायऱ्या चढून थेट स्टेजवरच खांद्यावर घेऊन गेले. युवकांमध्ये हर्षवर्धन पाटील यांचे आकर्षक व्यक्तिमत्त्वाविषयी क्रेझ निर्माण झाली असून, जनतेमध्येही हर्षवर्धन पाटील यांचेबद्दल सहानुभूतीची लाट निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.**

# 'वाढवू तिरंग्याची शान, करू राष्ट्रासाठी मतदान'-बाईकरॅली द्वारे मतदारांमध्ये जागृती

## रॅलीत महापालिका आयुक्त यांचा सहभाग;नांदेडकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**





नांदेड 'वाढवू तिरंग्याची शान.. करू राष्ट्रासाठी मतदान', 'मतदार राजा जागा हो.. लोकशाहीचा धागा हो', 'वोट करेगा वोट करेगा.. सारा नांदेड वोट करेगा' अशा विविध फलक व घोषणांनी मतदार जागृतीसाठी शनिवार, १६ नोव्हेंबर रोजी काढण्यात आलेल्या सायकल व मोटरसायकल रॅलीला नांदेडकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या रॅली मध्ये जवळपास ५० सायकल व ५०० मोटरसायकल बाईक सहभागी होत्या.

मतदानाच्या टक्केवारीत वाढ करण्यासाठी, लोकशाही समृद्ध व बळकट करण्याकरिता निवडणूक आयोगातर्फे विविध उपक्रम राबविले जात आहेत. जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत व जिल्हास्तरीय स्वीप कक्षाच्या नोडल अधिकारी तथा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांच्या संकल्पनेतून 'स्वीप'अंतर्गत भव्य सायकल व मोटरसायकल रॅली काढण्यात आली.या जनजागृती रॅलीस महानगरपालिकेचे आयुक्त तथा जिल्हास्तरीय स्वीप कक्षाचे अतिरिक्त नोडल अधिकारी डॉ.महेशकुमार डोईफोडे, उपायुक्त अजितपालसिंघ संधू, संजय जाधव, जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी माध्यमिक माधव सलगर, शिक्षणाधिकारी प्राथमिक सविता बिरगे, शिक्षणाधिकारी योजना दिलीपकुमार बनसोडे, महानगरपालिकेचे शिक्षण अधिकारी व्यंकटेश चौधरी, महापालिकेचे कार्यकारी अभियंता संघरत्न सोनसळे, सहाय्यक आयुक्त डॉ.मिर्झा फरहतउल्ला बेग, सदाशिव पतंगे, ८७-नांदेड दक्षिण मतदारसंघ स्वीप कक्षाचे प्रमुख रुस्तुम आडे, अग्निशमन अधिकारी केरोजी दासरे, एस.जी.जी.एस. अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी यांच्यासह नांदेड लॉयन्स क्लब, रोटरी क्लब व नांदेड सायकलिस्ट ग्रुप चे सदस्य उपस्थित होते.जुना मोंढा टॉवर परिसरातून महापालिका आयुक्तांच्या शुभहस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅली ची सुरुवात झाली. पुढे महावीर चौक - वजीराबाद मुथा चौक - कला मंदिर - शिवाजीनगर - आयटीआय कॉर्नर - श्रीनगर - वर्कशॉप कॉर्नर मार्गे - भाग्यनगर - आनंदनगर - नागार्जुना हॉटेल कॉर्नर - लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक - यात्री निवास - चिखलवाडी कॉर्नर मार्गे जिल्हाधिकारी कार्यालय येथे पोहचून सर्व सहभागी व्यक्तींनी मतदानाची शपथ घेतली व रॅलीचा समारोप झाला. नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी आयोजित रॅलीला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. या रॅलीत अधिकारी कर्मचाऱ्यांसह विविध मान्यवर नागरिक, विद्यार्थी, महिला व सामाजिक संघटनांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. यावेळी मतदानाबाबत विविध फलक व घोषणाद्वारे जनजागृती करण्यात आली. या रॅलीच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषदेचे प्रलोभ कुलकर्णी, महानगरपालिकेचे वरिष्ठ सहाय्यक साईराज मुदिराज, स्विप कक्षाचे सुनील मुत्तेपवार, माणिक भोसले, सारिका आचमे यांनी परिश्रम घेतले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirkala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904